दिनांक :     .9.2019

**प्रति,**

**मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : लोकसंख्येचे नियंत्रण आणि संतुलन राखण्यासाठी कायदा करणे अन् देशभरात समान नागरी कायदा लागू करणे यांविषयी ......**

महोदय,

समान नागरी कायद्याची मागणी पुष्कळ वर्षांपासून देशातील विविध घटकांकडून सातत्याने करण्यात येत आहे. याच विषयाला हात घालत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून जोरदार भाषण केले. या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी 'लोकसंख्येचा विस्फोट ही भयंकर समस्या बनू शकते. देशात काही लोकांना ही जाणीव आहे की, छोटे कुटुंब असेल, तर ते सुखी राहू शकते. ती एकप्रकारे देशभक्ती आहे', असे सांगितले. देशात बहुसंख्य आणि अल्पसंख्य असे दोन जनसमूह मानले जातात. सध्या अल्पसंख्याकांच्या नावाखाली देशातील मुसलमान समाजाला आजवर पुष्कळ सुविधा, सवलती मिळाल्या. त्यांच्यावर ना विवाहांच्या संख्येचे ना मुलांना जन्म देण्याचे बंधन आहे. परिणामी त्यांची लोकसंख्या एवढ्या गतीने वाढत आहे की, धर्माच्या नावावर भारताची फाळणी झाल्यानंतरही काही दशकांमध्ये इंडोनेशिया या मुसलमानबहुल देशानंतर अधिक मुसलमान लोकसंख्या असणारा भारत देश बनेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

'लोकसंख्या नियंत्रण' ही देशातील सर्वांत मोठी समस्या बनली आहे. देशाचा विकास, आर्थिक स्थिती, राहणीमानाचा दर्जा आणि देशातील दरडोई उत्पन्न हे देशाच्या लोकसंख्येवर अवलंबून आहे. १३६ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेला आपला देश हा चीननंतर सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील उपलब्ध नैसर्गिक साधन सुविधा, विकास दर आणि आर्थिक स्थिती यांवर परिणाम होत आहे. देशातील कोणत्याही मेट्रो, रेल्वे स्टेशन, विमानतळ, रस्ते, बस स्थानके, रुग्णालये, बाजारपेठा आदी ठिकाणांवर प्रचंड गर्दी असते. त्यामुळे सर्व सुविधा सर्व लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. हे लोकसंख्या वाढीचे भीषण सत्य आहे. आज देशात लोकसंख्या नियंत्रणासाठी सक्षम कायदा नसल्यामुळे लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढते आहे.

*** याविषयी आम्ही काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत**

१. वर्ष २०११ च्या जनगणना अहवालाच्या आकडेवाडीनुसार वर्ष २००१ ते २०११ या कालावधीत भारतातील मुसलमानांच्या लोकसंख्येत तब्बल २४ टक्के वाढ झाली आहे. वर्ष १९९१ ते २००१ या कालावधीत देशात लोकसंख्या वाढीचे सरासरी प्रमाण १८ टक्के असतांना मुसलमानांच्या लोकसंख्येत २९ टक्के इतकी वाढ झाली होती. ही आकडेवारी ८ वर्षांपूर्वीची असून सध्या याचे प्रमाण किती असेल, याचा विचारच न केलेला बरा ! कुटुंबनियोजन न करण्याच्या धोरणामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. हे प्रमाण असेच राहिल्यास एक दिवस हा देश मुसलमानबहुल होईल, इतकी गंभीर स्थिती आहे. याचप्रमाणे अल्पसंख्यांकांच्या नावाखाली केवळ मुसलमानांची सर्व सोयी-सुविधा लाटल्याने हिंदूंमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष आहे.

२. देशात एकूण लोकसंख्येतील मुस्लिमांचे प्रमाण १३.४ टक्क्यांवरून आता १४.२ टक्क्यांवर गेले आहे.

३. देशाची प्रतिवर्ष लोकसंख्या वाढ सरासरी ०.८ प्रतिशत आहे, तर एकट्या उत्तरप्रदेश येथे मुसलमान लोकसंख्या वाढीची सरासरी दोन टक्के इतकी आहे. आसाम आणि पश्चिम बंगाल येथील मुसलमान लोकसंख्या वाढीची आकडेवारी देशाच्या लोकसंख्या वाढीच्या सरासरीपेक्षा दुप्पट आहे.

४. आसाम राज्यातील मुसलमानांची लोकसंख्या हिंदूंच्या तुलनेत सर्वाधिक प्रमाणात वाढली आहे. आसाममध्ये वर्ष वर्ष २००१ मध्ये ३०.९ टक्के असणारी लोकसंख्या वाढून ती ३४.२ टक्के झाली आहे, तर बंगालमध्ये वर्ष २००१ मध्ये

मुसलमान २५.२ टक्के होते, तर वर्ष २०११ मध्ये ही संख्या वाढून २७ टक्के झाली. दोन्ही राज्यातील ही आकडेवारी देशाच्या लोकसंख्या वाढीच्या कितीतरी अधिक आहे.

५. 'ग्लोबल फूटप्रिंट नेटवर्क' या स्वयंसेवी संस्थेच्या अभ्यासानुसार आपल्या देशात उपलब्ध साधनसुविधांच्या तुलनेत देशाची लोकसंख्या दुप्पट आहे. या दोन्हीचे संतुलन बिघडले आहे. यातच ५ कोटींहून अधिक बांगलादेशी घुसखोर मुसलमान, ४० सहस्रांहून अधिक रोहिंग्या मुसलमान, व्हिसाची मुदत संपून देखील परत न गेलेले सहस्रो पाकिस्तानी नागरिक आदींमुळे देशातील रोजगार आणि साधनसुविधांची लूटमार होत आहे.

६. लोकसंख्या नियंत्रणासोबतच आपल्या देशात 'लोकसंख्या संतुलन'ही बिघडत चालले आहे. एकाच देशात हिंदु आणि मुसलमान यांच्यासाठी दोन वेगळे कायदे अस्तित्वात आहेत. प्रचलित भारतीय कायद्यानुसार हिंदूंना एका पत्नीचे बंधन आहे; परंतु मुसलमानांना असे बंधन नाही. मुसलमान अधिक विवाह आणि अधिक पत्नी करू शकतात. त्यामुळे कुटुंबनियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण या संकल्पना अन् त्याविषयीची जनजागृती केवळ हिंदूंसाठीच होते. परिणामी हिंदू लोकसंख्या घटत असून मुसलमानांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. तसेच धर्मांतर, लव्ह-जिहाद आदी कारणांमुळे अनेक राज्यांत हिंदु अल्पसंख्य झाले आहेत.

७. पूर्वीच्या शासनाच्या धोरणानुसार लोकसंख्येच्या प्रमाणावरून अल्पसंख्यांक ठरवण्यात येते होते. त्यामुळे काश्मीरसह नागालॅण्ड, मणीपूर आणि अन्य अशा ८ राज्यांमध्ये आज हिंदूंची संख्या अत्यंत अल्प असून तेथे ते अल्पसंख्य ठरत नाहीत. त्यांना कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे ज्या राज्यात हिंदु अल्पसंख्य आहेत त्यांच्यावर इतकी वर्षे होत असलेला अन्यायच आहे. याउलट अल्पसंख्य म्हणवून घेणाऱ्या मुसलमानांची लोकसंख्या अनेक राज्यांत हिंदूंपेक्षा कितीतरी पटीने अधिक वाढूनही तेथे शासकीयदृष्ट्या ते अल्पसंख्यांकच आहेत आणि त्यांना सर्वत्र सुविधा पुरवण्यात येतात. हा अन्याय असून नेमके अल्पसंख्य कोणाला म्हणायचे, त्याचे निकष काय ? हे ठरवण्याची वेळ आता आली आहे.

*** तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. 'हम दो, हमारे दो' हा लोकसंख्या नियंत्रणाचा संदेश हिंदूंसाठी दिला जातो; मात्र मुसलमानांना दिला जात नाही. परिणामी लोकसंख्या संतुलन बिघडतच चालले आहे. हे असतुंलन रोखण्यासाठी 'लोकसंख्या नियंत्रण आणि संतुलन' राखणारा अन् सर्व धर्मीयांना लागू असणारा कायदा तात्काळ करण्यात यावा.

२. या देशात मुसलमानांना विवाह, तसेच अन्य कायदे लागू नसल्याने त्यांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामुळे सामाजिक असमतोल निर्माण होत आहे. त्यामुळे या देशात समान नागरी कायदा लागू करून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी.

३. सर्वोच्च न्यायालयाने किमान तीन वेळा समान नागरी कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शासनाने या न्यायालयांच्या भावना लक्षात घेऊन त्वरित उपाययोजना घोषित करावी.

आपला विश्वासू,

संपर्क :